| MHYA160002152021 | दाखल तारीख – २५/०३/२०२१ |
|---|---|
| | नोंदणी तारीख – २५/०३/२०२१ |
| | निकाल तारीख –१७/०४/२०२५. |
| | कालावधी – ०४**व.**००**म.**२२**दि.** |

**दिवाणी न्यायाधीश क.स्तर, बाभुळगांव यांचे न्यायालयात**
**(पीठासीन अधिकारी प्र.चं.बारटक्के)**

**नि.दि.मु.क्र. ०६/२०२१**
**निशाणी क्र. ५०/अ**

१) श्री. संतोष मारोती ढोकणे,
वय ४८ वर्षे, व्यवसाय – नोकरी व शेती,
रा. सरुळ ता. बाभुळगाव, जिल्हा यवतमाळ. ... **वादी**

**विरुध्द**

१) श्रीमती शांताबाई मारोती ढोकणे,
वय–७५ वर्षे, धंदा – शेती,
२) प्रमोद मारोती ढोकणे,
वय–४९ वर्षे, धंदा – शेती,
३) राजेंद्र मारोती ढोकणे,
वय–५२ वर्षे, धंदा – शेती,
प्रतिवादी क्र. १ ते ३ रा. सरुळ,
ता. बाभुळगांव, जि. यवतमाळ.
४) बेबीबाई विठ्ठल टाले,
वय–५५ वर्षे, धंदा – शेती,
रा. कावली (वसाड),
ता. धामणगाव, जि. अमरावती,
५) लता रंजीतराव कोल्हे,
वय–५४ वर्षे, धंदा – शेती,
रा. आपटी, ता. देवळी, जि. वर्धा. ... **प्रतिवादी**

.....................................................................................................

**दावा जाहीर घोषणा, वाटप व ताबा मिळण्याकरीता**

.....................................................................................................

| | | |
|---|---|---|
| वादीतर्फे वकील | – | श्री. एन. आर. खंडारे |
| प्रतिवादी क्र. १ व ५ तर्फे वकील | – | श्री. वाय. एस. डोंगरे |
| प्रतिवादी क्र. ३ तर्फे वकील | – | श्री. एम. एम. दातार |
| प्रतिवादी क्र. २ व ४ तर्फे | – | एकतर्फा |

.....................................................................................................

**न्यायनिर्णय**

(जाहीर केल्याची तारीख १७/०४/२०२५)

०१. वादीचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे आहे.

जिल्हा यवतमाळ तालुका बाभुळगांव पैकी मौजे सरुळ येथील गट क्र. ६/१, क्षेत्र ०१ हे.–८३ आर. आकार रुपये ४.८५ पैसे आणि गट क्र. ६/२ क्षेत्र ०१ हे.–६२ आर. आकार रुपये ४.५० पैसे या शेतजमीन मिळकती प्रस्तुत दाव्याचा वाद विषय आहेत. (येथून पुढे सदर मिळकतींना "दावा मिळकत" असे संबोधले आहे.)

०२. प्रतिवादी क्र. १ ही वादीची आई असून प्रतिवादी क्र. २ ते ५ हे वादीचे सख्खे भाऊ बहीण आहेत. वादी व प्रतिवादी क्र. २ ते ५ चे वडील आणि प्रतिवादी क्र. १ चे पती मारोती गणपत ढोकणे यांना त्यांच्या वडीलांकडून मालमत्ता प्राप्त झाली. त्याचा जुना स. क्र. ५ होता व क्षेत्र ३ हे ४५ आर होते. त्यानंतर आपसी वाटणी होऊन मौजे सरुळ येथील गट क्र. ६ एकुण क्षेत्र ३ हे ४५ आर ही मिळकत मारोती गणपत ढोकणे यांच्या मालकीची व वहीवाटीची झाली. त्यानंतर दिनांक १०.०९.१९९८८ रोजी प्रतिवादी क्र. ३ याच्या सांगण्यानुसार व प्रतिवादी क्र. ३ च्या त्रासापोटी मारोती गणपत ढोकणे यांनी सदर मिळकतीचे अवैध वाटणीपत्र बनविले. त्यावेळी वादी हा अज्ञान होता. वादीचा कोणाताही हक्क राखीव न ठेवता व पालनकर्ता या नात्याने कोणतीही जबाबदारी पार न पाडता मारोती यांनी अवैधरित्या प्रतिवादी क्र.

३ च्या हक्कात वाटणीपत्र करुन दिले. सदर वाटणीपत्रास मारोती यांची संमती नव्हती. सदर वाटणीपत्रानुसार दावा मिळकतींची समसमान विभागणी झाली नाही. त्यामुळे वादीने प्रतिवादींना विधिज्ञांमार्फत नोटीस पाठविली व दावा मिळकतींचे वाटप करुन मागीतले. सदर नोटीस प्राप्त होवूनही प्रतिवादींनी त्यास उत्तर दिले नाही आणि वाटणीपत्र रद्द करुन दावा मिळकतींचे वाटप करुन दिले नाही. त्यामुळे वादीने प्रस्तूतचा दावा दाखल करुन दिनांक १०.०९.१९८८ रोजीचे वाटणीपत्र अवैध आहे अशी जाहीर घोषणा होवून मिळण्याची, दावा मिळकतींचे वाटप होवून स्वतंत्र ताबा मिळण्याची आणि दरम्यानच्या उत्पन्नाबाबत चौकशी होवून मिळण्याची विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी क्र. १ व ५ यांनी निशाणी १५ कडे लेखी जबाब दाखल करुन संपूर्ण दावा मान्य केला आहे आणि वादीच्या मागणीप्रमाणे वाटणीपत्र गैरकायदेशीर असल्याचे घोषीत करुन दावा मिळकतींचे वाटप कराण्यात यावे असे कथन केले आहे.

०४. प्रतिवादी क्र. ३ ने निशाणी २१ कडे कैफियत दाखल करुन प्रस्तुत दाव्यास विरोध केला. प्रतिवादी क्र. ३ ने वादी व प्रतिवादींचे नातेसंबंध मान्य केले. मात्र दावा मिळकती मारोती यांच्या वडीलोपार्जीत मिळकती असल्याचे नाकारले. त्याने असे कथन केले की, दावा मिळकती या वाटणीपत्राव्दारे त्याच्या नावे नोंद झाल्या आहेत. सदर वाटपपत्र करते वेळेस म्हणजेच दिनांक १०.०९.१९८८ रोजी त्याचे वडील मारोती गणपत ढोकणे यांची प्रकृती ठणठणीत होती, त्यांना कोणताही आजार नव्हता, त्यांची सारासार विचार करण्याची शक्ती अत्यंत चांगली होती व त्यांना बरेवाईटपणाचे संपूर्ण ज्ञान होते. मारोती यांचा मृत्यू दिनांक १३.०५.२०११ रोजी म्हणजेच वाटणी पत्रानंतर २३ वर्षांनी झाला आहे. सदर २३ वर्षात मारोती यांनी वाटणीपत्र आव्हाणीत केलेले नाही. सदर वाटणीपत्र मयत मारोती यांच्या संमतीने झाले होते. प्रतिवादी क्र. ३ ने मारोती यांचा चांगला सांभाळ केला होता. तसेच प्रतिवादी क्र. ३ ने वादीच्या शिक्षणासाठी आणि वादी नोकरीवर लागेपर्यंत संपूर्ण खर्च केला आहे.

तसेच प्रतिवादी क्र. ३ ने त्याच्या बहीणींच्या विवाहाचा खर्च केला आहे. सदर वाटपपत्र कायदेशीर आहे. अंततः प्रतिवादीने प्रस्तुतचा दावा नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

०५. प्रतिवादी क्र. २ व ४ यांनी दाव्याच्या समन्सची बजावणी होवूनही ते प्रस्तूतकामी हजर झाले नाहीत. त्यामुळे निशाणी १ वरील आदेशानुसार प्रस्तूत प्रकरण प्रतिवादी क्र. २ व ४ यांच्याविरुध्द एकतर्फा चालविण्यात आले.

०६. माझे पूर्व पिठासिन अधिकारी यांनी वादपत्र निशाणी १ व कैफीयत निशाणी २१ मधील कथनांचा विचार करता दाव्याचे निर्णयासाठी निशाणी २४ कडे मुद्दे निश्चित केले. त्यांचे निष्कर्ष कारणमीमांसेसह मी खालीलप्रमाणे देत आहे.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १. वादी असे शाबीत करतो काय की, दावा मिळकती या त्याच्या व प्रतिवादींच्या एकत्र कुटुंबाच्या वडीलोपार्जीत मिळकती आहेत ? | .... नाही. |
| २. वादी असे शाबीत करतो काय की, दिनांक १०.०९.१९८८ रोजीचे दावा मिळकतींचे वाटणीपत्र अवैध व बेकायदेशीर आहेत ? | .... नाही. |
| ३. वादी त्याच्या मागणीप्रमाणे जाहीर घोषणेचा आदेश होवून मिळण्यास पात्र आहे का ? | ....नाही. |
| ४. वादी त्याच्या मागणीप्रमाणे दावा मिळकतींचे वाटप होवुन मिळण्यास पात्र आहे काय ? असल्यास हिस्सा किती ? | ....अंशतः होय. |
| ५. वादी त्याच्या मागणीप्रमाणे दावा मिळकतीचे वाटप होवुन त्याच्या हिस्याचा स्वतंत्र ताबा मिळण्यास पात्र आहे का ? | ...अंशतः होय. |
| ६. वादी त्याच्या मागणीप्रमाणे दरम्यानच्या | |

नफ्याबाबत चौकशीचा आदेश होवून मिळण्यास
पात्र आहे का ?

....नाही.

७. आदेश व हुकुमनामा ?

.... अंतिम आदेशाप्रमाणे.

०७. दाव्याचे शाबीतीकरीता वादीने स्वतःचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि.२५ कडे दाखल केले आहे. तसेच वादीने खालील कागदपत्रे दाखल केली आहेत.

क. ७/१२ उतारे निशाणी ३१ व ३२

ख. फेरफार उतारे निशाणी ३३ व ३४

ग. प्रतिवादींना पाठविलेल्या नोटीसची स्थळप्रत निशाणी ३५

घ. नोटीस पाठविल्याबाबत पावत्या निशाणी ३६

च. नोटीस पोहोचल्याच्या पावत्या निशाणी ३७ ते ४०

छ. नोटीसीचा परत आलेला लखोटा निशाणी ४१

त्यानंतर नि.४४ कडे पुरसीस दाखल करून वादीने पुरावा बंद केला आहे.

०८. प्रतिवादी क्र. ३ ने बचावाच्या अनुषंगाने स्वतःचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र निशाणी ४५ कडे व प्रतिवादी साक्षीदार क्र. २ प्रमोद मारोतराव ढोकणे यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र निशाणी ४८ कडे दाखल केले. तसेच प्रतिवादी क्र. ३ ने खालील कागदपत्रे दाखल केली.

अ. मृत्यु प्रमाणपत्र निशाणी ४६

ब. शाळा सोडल्याचा दाखला निशाणी ४७

प्रतिवादी क्र. ३ ने निशाणी ४९ कडे पुरसीस दाखल करुन पुरावा बंद केला.

०९. वादी व प्रतिवादी क्र. ३ च्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, वादीने सबळ पुरावा देवून दिनांक १०.०९.१९८८ रोजीचे वाटपपत्र अवैध व गैरकायदेशीर असल्याचे सिध्द केले आहे. तसेच दावा मिळकती या वडीलोपार्जीत असल्याचे सिध्द केले आहे. त्यामुळे दावा

मंजूर करण्यात यावा. याउलट प्रतिवादी क्र. ३ च्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, दिनांक १०.०९.१९८८ रोजीच्या वाटणीपत्रानुसार त्यांची नावे दावा मिळकतीच्या सातबारा उताऱ्यांवर नोंद झाली आहेत. सदर वाटणीपत्र कायदेशीर आहे. त्यानुसार मालकी हक्काने दावा मिळकती उभय पक्षकारांच्या ताब्यात आहेत. सन २०२१ मध्ये केलेला प्रस्तूत दावा मुदतीत नाही. त्यामुळे दावा नामंजूर करण्यात यावा.

१०. दावा मिळकती मयत मारोती गणपत ढोकणे यांना त्यांचे वडील गणपत सदुजी ढोकणे यांच्याकडून वाटपाने प्राप्त झाल्याची बाब उभय पक्षकारांमध्ये निर्विवाद आहे. तसेच उभय पक्षकांरांमधील नातेसंबंध निर्विवाद आहेत. तसेच मयत मारोती यांनी दिनांक १०.०९.१९८८ रोजी दावा मिळकतींचे वाटपपत्र तयार केले ही बाब देखील उभय पक्षकारांमध्ये निर्विवाद आहे. तसेच वादी व प्रतिवादी क्र. २ ते ५ चे वडील आणि प्रतिवादी क्र. १ चे पती मारोती गणपत ढोकणे हे दिनांक १३.०५.२०११ रोजी मरण पावल्याची बाब निर्विवाद आहे.

## कारणमीमांसा

**मुद्दा क्रमांक १ व २** –

( मुद्दा क्र.१ व २ हे एकमेकांशी निगडीत असल्याने विवेचनाची पुनरावृत्ती टाळण्याकरिता एकत्र चर्चेसाठी घेतले आहेत. )

११. वादीने सरतपासामध्ये दाव्यातील कथनांचा पुनरुच्चार केला आहे. त्याने असे कथन केले की, दावा मिळकत त्याचे वडील मारोती यांना त्यांचे वडील गणपत यांच्याकडून आपसी वाटपपत्रानुसार प्राप्त झाली. त्यानुसार मयत मारोती हे दावा मिळकतींचे मालक व ताबेदार झाले. त्यानंतर प्रतिवादी क्र. ३ याच्या सांगण्यानुसार व त्याच्या त्रासापोटी मयत मारोती यांनी अवैध वाटणीपत्र बनविले. ते वाटणीपत्र बनवितेवेळेस तो अज्ञान होता. त्याचा कोणताही हक्क राखुन न ठेवता व पालनकर्ता या नात्याने कोणतीही जबाबदारी पार न पाडता मयत मारोती यांनी प्रतिवादी क्र. ३ च्या हक्कात अवैध वाटणीपत्र करुन दिले. त्यास मयत मारोती यांची संमती नव्हती. त्या

वाटणीपत्रानुसार दावा मिळकतींची समसमान विभागणी झाली नाही.

१२. वादीच्या कथनानुसार मयत मारोती यांनी दावा मिळकतींचे केलेले वाटणीपत्र हे दिनांक १०.०९.१९८८ रोजीचे आहे. प्रतिवादी क्र. ३ ने सदर बाब नाकारलेली नाही. मात्र दिनांक १०.०९.१९८८ रोजीचे मूळ वाटणीपत्र उभय पक्षकारांच्या ताब्यात नसल्याने ते अभिलेखावर दाखल करण्यात आलेले नाही. असे असले तरी, उभय पक्षकारांमध्ये सदर वाटणीपत्र तयार करण्यात आल्याबाबत वाद नाही. तसेच वादीतर्फे दाखल फेरफार उतारे निशाणी ३३ व ३४ चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दिनांक १०.०९.१९८८ रोजीच्या आपसी वाटणीपत्रानुसार दावा मिळकतींची वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये विभागणी करण्यात आली असल्याची नोंद महसुल अभिलेखात घेण्यात आलेली आहे. त्यानुसार दावा मिळकत गट क्र. ६/२ प्रतिवादी क्र. ३ च्या हिस्यात देण्यात आली असून दावा मिळकत गट क्र. ६/१ ही वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये समाईकात ठेवण्यात आली आहे. त्यानुसार वादीतर्फे दाखल दावा मिळकतींचे सातबारा उतारे निशाणी ३१ व ३२ वर वादी व प्रतिवादी यांच्या नावाची नोंद झाल्याचे दिसून येते.

१३. वादीतर्फे दाखल दावा मिळकतींचे सातबारा उतारे व फेरफार उतारे हे दिनांक १०.०९.१९८८ रोजीच्या आपसी वाटणीपत्रानुसार दावा मिळकतींची वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये विभागणी झाल्याचे दर्शवितात.

१४. वादीच्या कथनानुसार सदर वाटणीपत्र हे प्रतिवादी क्र. ३ च्या त्रासापोटी आणि त्याच्या सांगण्यानुसार मयत मारोती यांनी तयार केले आहे. त्यानुसार दावा मिळकतींची समसमान विभागणी झाली नाही. तसेच त्यावेळी वादी अज्ञान होता. त्यामुळे सदर वाटणीपत्र अवैध आहे. उलटतपासामध्ये वादीने असे कबुल केले की, सन १९८८ मध्ये त्याचे वडील मारोती यांची तब्बेत चांगली होती. त्यावेळी त्याचे वडील शेतीचा संपूर्ण व्यवहार पाहत होते. त्यावेळी त्याच्या वडीलांना व्यवहाराची समज होती. मात्र वादीने उलट तपासामध्ये त्याच्या वडीलांनी आपसी संमतीने वाटणीपत्र केल्याची बाब नाकारली. तसेच वाटणीपत्र वैध व कायदेशीर असल्याचे

नाकारले.

१५. या व्यतिरिक्त वादीच्या वाटणीपत्र अवैध आहे या कथनास दुजोरा देणारा इतर कोणताही साक्षीदार वादीने तपासलेला नाही. वादीच्या उलटतपासातून सन १९८८ मध्ये मयत मारोती यांची प्रकृती चांगली होती व त्यांना व्यवहार ज्ञान होते या बाबी स्पष्ट झाल्या आहेत.

१६. प्रतिवादी क्र. ३ याने सरतपास निशाणी ४५ मध्ये लेखी जबाब निशाणी २१ मधील कथनांचा पुनःउच्चार केला आहे. त्याने असे कथन केले की, त्याने वडीलांचा सांभाळ केला, त्याच्या भावांचे शिक्षणाचा आणि बहीणींच्या विवाहाचा खर्च केला व भावांना नोकरी लागेपर्यंत त्यांचा सांभाळ केला. त्यामुळे त्याच्या वडीलांनी प्रकृती चांगली असताना स्वेच्छेने दिनांक १०.०९.१९८८ रोजी त्याचे हक्कात दावा मिळकतीचे वाटणीपत्र करुन दिले. सदर वाटणीपत्र त्यांनी सर्वांच्या संमतीने करुन दिले. प्रतिवादी क्र. ३ ने त्याच्या सदर कथनाच्या पृष्ठ्यर्थ प्रतिवादी साक्षीदार क्र. २ प्रमोद यास तपासले आहे. प्रमोद हा वादी व प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांचा मोठा भाऊ व प्रस्तूत प्रकरणातील प्रतिवादी क्र. २ आहे. त्याने सरतपासात असे कथन केले की, त्याचे वडील मयत मारोती यांनी दिनांक १०.०९.१९८८ रोजी प्रकृती ठणठणीत असताना व विचार शक्ती चांगली असताना स्वेच्छेने कोणाच्याही दबावात न येता दावा मिळकतींचे प्रतिवादी क्र. ३ च्या हक्कात वाटणीपत्र केले. प्रतिवादी क्र. ३ ने त्याच्या भावांच्या व बहीणींच्या शिक्षणाचा व विवाहाचा खर्च केला. वडीलांचा सांभाळ केला. त्यामुळे मयत मारोती यांनी सर्वांच्या संमतीने प्रतिवादी क्र. ३ च्या हक्कात वाटणीपत्र लिहून दिले.

१७. निशाणी ३१ ते ३४ कडील दावा मिळकतींच्या सातबारा व फेरफार उताऱ्यांवरुन दिनांक १०.०९.१९८८ च्या आपसी वाटणीपत्रानुसार दावा मिळकतींच्या महसुल अभिलेख सदरी वादी व प्रतिवादी यांच्या नावाच्या नोंदी झाल्याचे स्पष्ट झाले आहे. सदर उतारे प्रतिवादीच्या सरतपासातील वाटणीबाबतच्या कथनांना दुजोरा देतात. त्याचप्रमाणे सन १९८८ पासून सन २०२१ पर्यंत साधारण

३३ वर्षांच्या कालावधी करीता सदर नोंदी विना आव्हाणीत राहील्या आहेत. खुप मोठ्या कालावधीकरीता महसुल अभिलेखाच्या नोंदी विना आव्हाणीत राहील्या असतील तर त्या बिनचूक आहेत असे गृहितक आहे. प्रस्तूत प्रकरणातील सन १९८८ मधील नोंदी देखील साधारण ३३ वर्षे विना आव्हाणीत राहील्या आहेत. त्यामुळे सदर नोंदी देखील बिनचुक असल्याचे गृहितक लागु पडते.

१८. दावा मिळकतींच्या सन १९८८ मधील वाटणीपत्रानुसार घेण्यात आलेल्या नोंदी बिनचूक असल्याच्या गृहितकाचे वादीस खंडण करता येईल. मात्र त्याकरीता ठोस, विश्वासार्ह व पटण्यासारखा पुरावा देणे आवश्यक आहे. प्रस्तूत प्रकरणात वादीने सदर वाटणीपत्र हे प्रतिवादी क्र. ३ च्या सांगण्यानुसार व त्याच्या त्रासापोटी मयत मारोती यांनी केल्याचे कथन केले आहे. वादीच्या सदर कथना व्यतिरिक्त त्यास दुजोरा देणारा इतर कोणताही पुरावा वादीने दाखल केलेला नाही. तसेच त्याबाबत वादीने प्रतिवादी क्र. ३ अथवा प्रतिवादी साक्षीदार क्र. २ प्रमोद यांच्या उलटतपासातून देखील कोणतीही महत्वाची कबुली प्राप्त केली नाही. याउलट प्रतिवादी क्र. ३ याच्या सरतपासातील वाटणीपत्र हे मयत मारोती यांनी स्वेच्छेने, प्रकृती चांगली असताना व सर्वांच्या संमतीने केले या कथनास दुजोरा देणारा साक्षीदार म्हणजे वादी व प्रतिवादी क्र. ३ यांचा मोठा भाऊ प्रमोद यास तपासले आहे. तसेच दावा मिळकतीचे सातबारा उतारे व फेरफार उतारे देखील प्रतिवादी क्र. ३ च्या सदर कथनास दुजोरा देतात. त्यामुळे प्रतिवादीची वाटणीपत्र वैध व कायदेशीर आहे ही कथने विश्वासार्ह वाटतात. अशा परिस्थीतीत फेरफार क्र. २०८ व २०९ चे उतारे निशाणी ३३ व ३४ नुसारच्या नोंदी बिनचुक आहेत या गृहितकाचे खंडण करण्याकरीता केवळ वादीची सरतपासातील वरील कथने पुरेशी नाहीत.

१९. तसेच मारोती हे दिनांक १३.०५.२०११ रोजी म्हणजेच वाटणीपत्रानंतर साधारण २३ वर्षांनी मरण पावले आहेत. दरम्यानच्या काळात मयत मारोती यांनी देखील सदर वाटणीपत्र आव्हाणीत केले नाही. जर मयत मारोती याचे संसंमतीशिवाय दिनांक १०.०९.१९८८ रोजी वाटणीपत्र केले असते तर निश्चीतच

मयत मारोती यांनी त्यानंतर पुढील २३ वर्षात सदर वाटणीपत्र आव्हाणीत केले असते. मात्र त्यांनी सदर वाटणीपत्र आव्हाणीत केले नसल्याने ते मयत मारोती यांच्या संमतीने झाले असल्याचा निष्कर्ष निघतो. त्यामुळे वादीचे कथन म्हणजे वाटणीपत्र हे मारोती यांच्या संमतीशिवाय आणि प्रतिवादी क्र. ३ च्या त्रासापोटी तयार करण्यात आले हे पटण्यासारखे वाटत नाही.

२०. वादीच्या कथनानुसार दिनांक १०.०९.१९८८ रोजीच्या वाटणीपत्रानुसार दावा मिळकतींची समसमान वाटणी झाली नाही. दाखल पुराव्यातून सदर वाटणीपत्रानुसार दावा मिळकत गट क्र. ६/१ मध्ये वादी व प्रतिवादी यांना समान हिस्सा देण्यात आल्याचे स्पष्ट होते. तसेच गट क्र. ६/२ ही मिळकत सदर वाटणीपत्रानुसार केवळ प्रतिवादी क्र. ३ च्या हिस्यात देण्यात आल्याचे स्पष्ट होते. गट क्र. ६/२ या मिळकतीचे समसमान वाटप झाले नसल्याचे दिसून येते. मात्र दाखल पुराव्यातून असे देखील स्पष्ट झाले आहे की, दावा मिळकती या मयत मारोती यांना वाटपाने त्यांचे वडील मयत गणपत यांच्यापासून प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे मयत मारोती वाटपाने दावा मिळकतींचे स्वतंत्र मालक व ताबेदार झाले होते. त्यांना दावा मिळकतींची विल्हेवाट लावण्याचा कायदेशीर अधिकार होता. तसेच प्रतिवादी क्र. ३ तर्फे दाखल पुराव्यातून असे देखील स्पष्ट होते की, त्याने त्याच्या भावा बहीणींच्या विवाहाचा व शिक्षणाचा खर्च केला आहे. तसेच त्याने त्याच्या आईवडीलांचा सांभाळ केला आहे. त्यामुळे मयत मारोती यांनी दावा मिळकत गट क्र. ६/२ प्रतिवादी क्र. ३ च्या हिस्यात वाटपाने दिल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे सन १९८८ पासून अद्यापपर्यंत दावा मिळकत गट क्र. ६/२ ही संपूर्ण मिळकत प्रतिवादी क्र. ३ च्या ताब्यात असल्याचे दाखल पुराव्यातून स्पष्ट होते. सदर मिळकतीतील संपूर्ण उत्पन्न प्रतिवादी क्र. ३ हा घेत असल्याचे दिसून येते. त्यास सन २०२१ पर्यंत कोणीही आक्षेप घेतला नसल्याचे देखील स्प्ष्ट होते. त्यामुळे देखील सन १९८८ चे वाटणीपत्र सर्वांच्या संमतीने झाले होते असा निष्कर्ष निघतो.

२१. प्रतिवादीच्या विधिज्ञांनी दावा मुदतीत नसल्याचा युक्तीवाद केला आहे.

त्याबाबत वादीच्या विधिज्ञांना युक्तीवादा दरम्यान प्रश्न विचारण्यात आला असता वादीच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, वादीने दिनांक १८.१२.२०२० रोजी प्रतिवादींना नोटीस पाठविल्यानंतर दावा दाखल करण्यास कारण घडले आहे. त्यामुळे दावा मुदतीत आहे.

२२. प्रतिवादी क्र. ३ व प्रतिवादी साक्षीदार क्र. २ प्रमोद यांनी उलटतपासामध्ये वाटणीपत्र करते वेळेस वादीचे वय १८ वर्षापेक्षा कमी होते असे कबुल केले. मात्र वादी लहान असल्याने वाटणीपत्र करण्याकरीता न्यायालयाची परवानगी घेतली होती अथवा नाही हे त्यांना माहीत नसल्याचे कथन केले. दिनांक १०.०९.१९८८ रोजी वादीचे वय १८ वर्षापेक्षा कमी होते ही बाब वादीच्या सरतपासातून तसेच प्रतिवादी साक्षीदारांच्या उलटतपासातून स्पष्ट झाली आहे. मात्र सदर वाटणीपत्र करते वेळेस वादी अज्ञान असल्याने न्यायालयाची परवानगी घेतली होती अथवा नव्हती याबाबत कोणताही पुरावा समोर आला नाही.

२३. मुदतीचा कायदा आर्टीकल ५८ नुसार वाटणीपत्र अवैध घोषीत करुन मिळण्याकरीता दावा दाखल करण्यास तिन वर्षांची मुदत विहीत करण्यात आली आहे. सदर मुदत दावा दाखल करण्याचा अधिकार प्रथम ज्यावेळी प्राप्त होतो त्यावेळी पासून सुरु होतो. प्रस्तूत प्रकरणात वाटणीपत्राची तारीख १०.०९.१९८८ रोजी वादी अज्ञान होता. त्यामुळे सदर वाटणीपत्र अवैध आहे असे घोषीत करुन मिळण्याकरीता दावा दाखल करण्याची मुदत मुदतीचा कायदा आर्टीकल ५८ नुसार वादी सज्ञान झाल्यानंतर सुरु होते असे दिसून येते. प्रस्तूत दावा हा सन २०२१ मध्ये दाखल करण्यात आला असून दाव्यामध्ये वादीचे वय ४८ वर्षे असल्याचे नमुद आहे. त्यानुसार वादी हा सन १९९१ ते १९९२ च्या दरम्यान १८ वर्षांचा सज्ञान झाला असल्याचे स्पष्ट होते. त्यानंतर तिन वर्षाच्या आत वादीने सदर वाटणीपत्र अवैध असल्याचे घोषीत होवून मिळण्याची मागणी केली नाही.

२४. त्याचप्रमाणे वादीने उलटतपासामध्ये त्याला वाटणीपत्राबाबत माहीत नव्हते असे कथन केले. तसेच त्याने सन २००४ मध्ये त्याला वाटणीपत्राबाबत माहीत

पडले असे कथन केले आहे. वादीच्या उलटतपासातील सदर कथनावरुन त्याला सन २००४ पासून वाटणीपत्राबाबत माहीत होते असे जरी गृहित धरले तरी सन २००४ पासून तिन वर्षाच्या आत म्हणजेच सन २००७ पर्यंत वादीने सदर वाटणीपत्र आव्हाणीत करणे आवश्यक होते. वादीच्या कथनांवरुनच प्रस्तूतची मागणी मुदतीचा कायदा आर्टीकल ५८ नुसार मुदतीत नसल्याचे स्पष्ट होते.

२५. एकदरीत चर्चेतून मी या निष्कर्षाप्रत आलो आहे की, केवळ वादीची तोंडी कथने ही दिनांक १०.०९.१९८८ रोजीचे आपसी वाटणीपत्र अवैध व गैरकायदेशीर आहे हे सिध्द करण्यास पुरेशी नाहीत. सदर आपसी वाटणीपत्र अवैध व गैरकायदेशीर आहे असे दर्शविणारा इतर कोणताही पुरावा वादीतर्फे दाखल करण्यात आलेला नाही. तसेच प्रतिवादीतर्फे दाखल पुराव्यातून दिनाक १०.०९.१९८८ रोजीचे आपसी वाटणीपत्र वैध व कायदेशीर असल्याचे स्पष्ट होते. वाटणीपत्र अवैध आहे अशी घोषणा होवून मिळण्याची मागणी मुदतीत नाही. त्यामुळे मी या निष्कर्षाप्रत आलो आहे की, वादी हा दिनांक १०.०९.१९८८ रोजीचे आपसी वाटणीपत्र अवैध व गैरकायदेशीर आहे हे सिध्द करण्यास अपयशी ठरला आहे. तसेच दावा मिळकती या मयत मारोती यांच्या स्वतंत्र मालकीच्या असल्याचे देखील स्पष्ट झाले आहे. मयत मारोती यांनी त्यांच्या हयातीत दावा मिळकतींची वाटपाने विल्हेवाट लावली आहे. त्यामुळे दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या वडीलोपार्जीत असल्याची बाब देखील सिध्द होवू शकत नाही. सबब, मी मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर नाही असे नोंदवितो.

**<u>मुद्दा क्रमांक ३</u> –**

२६. मुद्दा क्र. १ व २ च्या निष्कर्षानुसार दिनांक १०.०९.१९८८ रोजीचे वाटणीपत्र अवैध व गैरकायदेशीर आहे हे सिध्द करण्यास वादी अपयशी ठरला आहे. पर्यायाने वादी त्याच्या मागणीप्रमाणे सदर वाटणीपत्र अवैध व गैरकायदेशीर आहे अशी जाहीर घोषणा होवून मिळण्यास पात्र नाही. सबब, मी मुद्दा क्र. ३ चे उत्तर नाही असे नोंदवितो.

**मुद्दा क्रमांक ४ व ५ –**

२७. मुद्दा क्र. १ व २ च्या निष्कर्षानुसार दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या वडीलोपार्जीत असल्याचे सिध्द करण्यास वादी अपयशी ठरला आहे. असे असले तरी, दिनांक १०.०९.१९८८ च्या आपसी वाटणीपत्रानुसार वादी व प्रतिवादी यांना दावा मिळकत गट क्र. ६/१ मध्ये समान हिस्सा देण्यात आला आहे. त्यामुळे वादी व प्रतिवादी यांच्या विधिज्ञांनी युक्तीवादामध्ये दावा मिळकत गट क्र. ६/१ मध्ये वादी व प्रतिवादी यांना समान हिस्सा असल्याचे जाहीर करण्यात यावे अशी विनंती केली. त्यामुळे मी या मताचा आहे की, केवळ दावा मिळकत गट क्र. ६/१ मध्ये वादी व प्रतिवादी क्र. १ ते ५ यांना समान हिस्सा आहे अशी जाहीर घोषणा करणे योग्य व न्यायोचित होईल. मात्र दावा मिळकत गट क्र. ६/२ चे वाटप होवून मिळण्यास वादी पात्र नाही. सबब, मी मुद्दा क्र. ४ व ५ चे उत्तर अंशतः होय असे नोंदवितो.

**मुद्दा क्रमांक ६ –**

२८. मुद्दा क्र. १ व २ च्या निष्कर्षानुसार वादी हा दिनांक १०.०९.१९८८ रोजीचे वाटणीपत्र अवैध व गैरकायदेशीर असल्याचे सिध्द करण्यास अपयशी ठरला आहे. पर्यायाने वादी हा दावा मिळकतीतील दरम्यानच्या उत्पन्ना बाबत आदेश होवून मिळण्यास पात्र नाही. सबब मी मुद्दा क्र. ६ चे उत्तर 'नाही' असे नोंदवितो.

**<u>मुद्दा क्रमांक ७ बाबत</u> –**

२७. वरीलप्रमाणे मुद्दा क्र.१ ते ६ चे निष्कर्षानुसार दावा अंशतः मंजुर होणेस पात्र आहे. सबब, मी मुद्दा क्रमांक ७ च्या उत्तरात खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

०१. दावा अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

०२. दावा मिळकत म्हणजेच मौजे सरुळ येथील शेतजमीन मिळकत गट क्र. ६/१, क्षेत्र ०१ हे.–८३ आर. मध्ये वादी व प्रतिवादी क्र. १ ते ५ यांना प्रत्येकी १/६ वा हिस्सा आहे असे जाहीर करण्यात येते.

०३. प्रस्तुतचे प्रकरण दावा मिळकत गट क्र. ६/१ चे सरस–निरस मानाने वाटप करण्यासाठी हुकुमनामा हा दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ५४ नुसार मा.जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्याकडे पाठविण्याकरीता वादीने दिवाणी प्रक्रीया संहिता आदेश २० नियम १८ अन्वये पुर्तता करण्यासाठी प्रलंबीत ठेवण्यात यावे.

०४. येणेप्रमाणे प्राथमिक हुकुमनामा करण्यात यावा.

(आदेश खुल्या न्यायालयात पारीत केला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by BARTAKKE PRADEEP CHANDRAKANT
Date: 2025.04.17 16:15:16 +0530

बाभुळगांव. (प्र.चं.बारटक्के)
दिनांक– १७/०४/२०२५ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बाभुळगांव